185

सहजीवन शिक्षण संस्था, खेड
विश्वस्थ मंडळ सभा दि. ०८.१०.२०१२

स्थळ :- एम.बी.ए. कॉलेज
वेळ :- स. ११.३० वाजता

## इतिवृत्त

सहजीवन शिक्षण संस्थेच्या विश्वस्थ मंडळाची सभा सोमवार दि. ०८.१०.२०१२ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता संस्थेच्या एम.बी.ए. कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील सभासद उपस्थित होते.

०१ - मा. हिराचंद प. कुथला.
०२ - मा. मदनभाई सुरा
०३ - मा. नंदकुमार द. गुजराथी
०४ - मा. मंगेशभाई कुथला.

निमंत्रित

०१ - मा. डॉ. संजीव ना. धारिया
०२ - मा. ॲड. आनंदराव भोसले
०३ - मा. शामकांत धारिया.

सभेच्या सुरुवातीला संस्थाध्यक्ष मा. हिराभाई कुथला यांनी उपस्थितांचे हार्दिक स्वागत केले, व सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

०१ - सभेपुढील पहिला विषय - मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजुरी देणे असा होता.

त्यानुसार सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुयला यांनी विश्वस्थ मंडळाच्या दि. १०.०३.२०११ रोजी संपन्न झालेल्या विश्वस्थ मंडळाच्या सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखविले, सदर इतिवृत्ताच्या पुर्ततेबाबत उपस्थितांमध्ये सविस्तर विचारविनिमय करण्यात आल्यावर पुढील ठराव करण्यात आला.

ठराव क्र.-०६.

"सहकारी शिक्षण संस्थेच्या मागील दि. १०.०३.२०११ रोजी संपन्न झालेल्या विश्वस्थ मंडळाच्या सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात येत आहे."

सुचक :-
अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

०२ सभेपुढील दुसरा विषय- संस्थेच्या सर्व शाखांचा प्रगती अहवाल घेणे असा होता. यासंदर्भात संस्थेच्या श्रीमान चंदुलाल शेठ हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज, आय.सी.एस कॉलेज, एम.बी.ए. कॉलेज इ. शैक्षणिक विभागांचे प्रगती अहवाल सभेपुढे सादर करण्यात आले. सदर अहवालांचे अवलोकन करण्यात येवुन त्यावर उपस्थितांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

०३. सभेपुढील तिसरा विषय- संस्थेच्या सध्या चालु असलेल्या बांधकामांचा आढावा घेवुन त्यासाठीच्या खर्चाविषयी विचार-विनिमय करणे असा होता.

यासंदर्भात सध्या संस्थेच्या आय.सी. एस. कॉलेजसाठी यु.जी.सी. अनुदानातुन लेडिज हॉस्टेल, प्रयोगशाळा, ग्रंथालय, त्याचप्रमाणे इनडोअर ट्रेनिंग सेंटरसाठीच्या इमारतींचे बांधकाम सुरु आहे या सर्व इमारत बांधकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यापैकी लेडिज हॉस्टेल, प्रयोगशाळा इमारत आणि इनडोअर ट्रेनिंग सेंटर या इमारतींचे बांधकाम अंशतः अपुर्ण आहे व ग्रंथालय इमारतीचे बांधकाम अद्याप सुरु होणे बाकी आहे. असे सभेपुढे सांगण्यात आले.

याबाबत विचारविनिमय करतांना लेडिज हॉस्टेल व प्रयोगशाळा इमारतींच्या वॉटरप्रुफींग संदर्भात चर्चा करण्यात आली यामध्ये वॉटरप्रुफींगसाठी येणारा खर्च व त्याची गॅरंटी कालावधी यांचा विचार करता सदर दोन्ही इमारतींवर पत्राशेड काढुन बांधकाम केल्यास अतिरिक्त खोल्या वापरास मिळू शकतात व गळतीचा त्रास कायमस्वरुपी बंद होवू शकतो व यासाठी पुर्वीच्या प्रयोगशाळा इमारतीवर असलेल्या

पत्राशेड पैकी काही साहित्य वापरात
येवू शकेल अशी माहिती देण्यात आली.
त्यानुसार वरील दोन्ही इमारतींवर
पत्रा शेड काढणेच सोईस्कर ठरु ~~शकते~~
~~शकेल~~ शकते असे मत उपस्थितांकडून
व्यक्त करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे
ठराव करणेत आला.

ठराव क्र. ०२

"संस्थेच्या आय. सी. एस. महाविद्यालयाच्या
लेडिज हॉस्टेल व प्रयोगशाळा इमारतीवर
पत्राशेड काढून बांधकाम करण्यात यावे
त्याचप्रमाणे ग्रंथालय इमारतीचे बांधकाम
लवकरात लवकर सुरु करुन पुर्ण करण्या-
साठी संबधित ठेकेदारास ~~सांगुन~~ सांगण्यात
येवून त्याचा पाठपुरावा करण्यात यावा.

सुचक :-
अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

४ सभेपुढील चौथा विषय - संस्थेच्या
इमारतीतील वर्गखोल्यांना नांवे
देण्यासंदर्भात विचारविनिमय करुन
निर्णय घेणे असा होता.
यासंदर्भात विचारविनिमय करतांना

कर्जाची लवकरात लवकर परतफेड होण्याच्या दृष्टीने संस्थेसाठी देणगीदार शोधणे आवश्यक असल्याचे सभेपुढे सांगण्यात आले.

या अनुषंगाने संस्थाध्यक्ष हिराभाई कुयला यांनी संस्थेला देणगी प्राप्त करुन देण्यासाठी मा. सुरेशराव भोरे यांचेबरोबर संपर्क साधण्याबाबत सुचित केले. याच संदर्भात डॉ. धारीया यांनी W.S. Vetamine तसेच मा. अरुण शेट व किशोरभाई धारणीया यांचेशी संपर्क साधल्यास देणगी मिळविण्यासाठी चांगला प्रतिसाद मिळू शकेल असे सांगितले.

त्यावर विचारविनिमय करण्यात येवुन पुढीलप्रमाणे ठराव करणेत आला.

ठराव क्र. ०४,

"संस्थेने एम.बी.ए कॉलेज इमारत बांधकामासाठी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी संस्थेच्या इमारतींच्या वर्गखोल्यांना नांव देण्यासाठी देणगी प्राप्त होण्यासाठी दाते शोधण्यात यावेत तसेच मान्यवरांनी सुचित केलेल्या दात्यांकडून जास्तीत जास्त देणगी प्राप्त करुन घेण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करण्यात यावेत. याबाबतीत मा. डॉ. संजीव ना. धारणीया यांनी पुढाकार घ्यावा असे ही सभा सुचित करीत आहे.

सुचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

०६. ~~सभा~~ सभेपुढील सहावा विषय- मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे अन्य विषय असा होता.

आयत्या वेळच्या विषयामध्ये.

०१ - आपल्या संस्थेने एम.बी.ए. कॉलेज सुरु करतांना पुणे येथील विश्वकर्मा इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेबरोबर ५ वर्षासाठी Joint Venture केले आहे. सदर Joint Venture किमान पुढील ३ वर्षासाठी वाढविण्याबाबतची सुचना मा. मदनभाई सुरा यांनी सभेपुढे दिली.

सदर सुचनेबाबत विचारविनिमय करण्यात आल्यावर या विषयासंदर्भात संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सर्वानुमते निर्णय घेण्यात यावा असे सुचित करण्यात आले.

०२. याच सभेच्या अनुषंगाने मा. ॲड. आनंदराव भोसले यांनी भाविक्यात संस्थेसाठी रु. १ लाख देणगी देण्याचे सुतोवाच केले. त्यांच्या अशा सुचनेबद्दल

कर्जाची लवकरात लवकर परतफेड होण्याच्या दृष्टीने संस्थेसाठी देणगीदार शोधणे आवश्यक असल्याचे सभेपुढे सांगण्यात आले.

या अनुषंगाने संस्थाध्यक्ष हिराभाई कुवल यांनी संस्थेला देणगी प्राप्त करून देण्यासाठी मा. सुरेशराव भोरे यांचेबरोबर संपर्क साधण्याबाबत सूचित केले. याचसंदर्भात डॉ. धारीया यांनी W.S. Vetawle तसेच मा. अरुण शेट व किशोरभाई धारीया यांचेशी संपर्क साधल्यास देणगी मिळविण्यासाठी चांगला प्रतिसाद मिळू शकेल असे सांगितले.

त्यावर विचारविनिमय करण्यात येऊन पुढीलप्रमाणे ठराव करणेत आला.

ठराव क्र. ०४,

"संस्थेने एम.बी.ए कॉलेज इमारत बांधकामासाठी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी संस्थेच्या इमारतींच्या वर्गखोल्यांना नांव देण्यासाठी देणगी प्राप्त होण्यासाठी दाते शोधण्यात यावेत तसेच मान्यवरांनी सूचित केलेल्या दात्यांकडून जास्तीत जास्त देणगी प्राप्त करून घेण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करण्यात यावेत. याबाबतीत मा. डॉ. संजीव ना. धारीया यांनी पुढाकार घ्यावा असे ही सभा सूचित करित आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

०६. ~~सभा~~ सभेपुढील सहावा विषय - मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे अन्य विषय असा होता.

आयत्या वेळच्या विषयामध्ये.

०१ - आपल्या संस्थेने एम.बी.ए. कॉलेज सुरु करतांना पुणे येथील विश्वकर्मा इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेबरोबर 5 वर्षासाठी Joint Venture केले आहे. सदर Joint Venture किमान पुढील 3 वर्षासाठी वाढविण्याबाबतची सूचना मा. मदनभाई सुरा यांनी सभेपुढे दिली.

सदर सूचनेबाबत विचारविनिमय करण्यात आल्यावर या विषयासंदर्भात संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सर्वानुमते निर्णय घेण्यात यावा असे सूचित करण्यात आले.

०२. याच सभेच्या अनुषंगाने मा. डॉ. आनंदराव भोसले यांनी भाविकाल संस्थेसाठी रु. 1 लाख देणगी देण्याचे सुतोवाच केले. त्याच्या अशा सूचनेबाबत

मा. मदनभाई सुरा यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले,

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुयला यांनी उपस्थितांचे आभार मानले व चहापान होऊन ही सभा संपन्न झाली.

| | |
|---|---|
| सेक्रेटरी<br>सहजीवन शिक्षण संस्था<br>खेड (रत्नागिरी) | अध्यक्ष<br>सहजीवन शिक्षण संस्था<br>खेड (रत्नागिरी) |

सहजीवन शिक्षण संस्था, खेड
विश्वस्थ मंडळ सभा दि. २०.०५.२०१४

स्थळ : एम. बी. ए. कॉलेज.
वेळ : सायं. ठीक ४.०० वाजता

इतिवृत्त

सहजीवन शिक्षण संस्थेच्या विश्वस्थ मंडळाची सभा मंगळवार दि. २०.०५.२०१४ रोजी सायं. ठीक ४.०० संस्थेच्या एम. बी. ए. कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे विश्वस्थ हजर होते.

०१. मा. हिराचंद प. बुटाला
०२. मा. नंदकुमार द. गुजराथी
०३. मा. मंगेशभाई बुटाला

निमंत्रित

०१. ॲड. मा. आनंदराव भोसले
०२. मा. ना. ब. भोसार
०३. प्राचार्य डॉ. डी. बी. सारंग

सभेच्या सुरुवातीला अध्यक्ष मा. हिराभाई बुटाला यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

०१. सभेपुढील पहिला विषय :-
विश्वस्थ मंडळाच्या मागील

सभेपासून आजपर्यंत विविध शाखांमध्ये झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

या संदर्भात मागील विश्वस्त मंडळाच्या सभेपासून आजपर्यंत संस्थेच्या एम. बी. ए. कॉलेज, आय. सी. एस. कॉलेज, श्रीमान चंदुलाल शेट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज इ. शाखांमध्ये करण्यात आलेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला. संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने करण्यात आलेला अशा प्रकारचा खर्च योग्य असला तरी या संदर्भातील तांत्रिक बाबींची पुर्तता वेळच्या वेळी होणे आवश्यक असल्याबाबत उपस्थितामध्ये सविस्तर विचारविनिमय करण्यात आल्यावर संस्थेच्या विविध शाखांमध्ये करण्यात आलेल्या खर्चाच्या संदर्भात खालीलप्रमाणे ठराव करणेत आले.

ठराव क्र. ०१

" संस्थेच्या आय. सी. एस. महाविद्यालयात संस्थेच्या हिश्श्यासह यु.जी.सी. अनुदानातुन बांधण्यात आलेल्या विद्यार्थीनी वसतीगृह, ग्रंथालय, प्रयोगशाळा, इमारतींच्या बांधकामासाठी झालेल्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक : मा. मंगेशभाई कुटाला
अनुमोदक : मा. नंदकुमार गुजराथी

ठराव सर्वानुमते मंजूर



ठराव क्र. ०२

" महाविद्यालयाच्या B.SC. (IT), BMS तसेच BCS या विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी सुरु असलेल्या नविन स्वतंत्र इमारतीच्या बांधकामासंदर्भातील सर्व कागदपत्र एकत्र करण्यात यावीत. सदर इमारतीच्या मुळ प्लॅनमध्ये पाणी साठवण टाकी, तसेच मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची योजना करण्यात आली आहे किंवा नाहि याची खात्री करुन घेणेत यावी.

सुचक : मा. नंदकुमार गुजराथी
अनुमोदक :- मा. मंगेशभाई कुटाला

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव क्र. ०३

" महाविद्यालयाच्या B.SC.(IT BMS तसेच BCS या विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र इमारतीसाठी रु. १० ७१००० हे सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात जमा होणाऱ्या फी मधुन देणेत यावेत. व उर्वरित बांधकाम कोटेशन मागवून पूर्ण करण्यात यावे त्याचप्रमाणे सदर बांधकाम संस्थेतर्फे केल्यामुळे संस्थेवर इन्कमटॅक्स व सर्व्हिस टॅक्स चा बोजा किती येतो याची माहिती घेण्यात यावी व या इमारतीचे

आर. सी. सी. डीझाईन घेण्यात यावे. या इमारतीच्या चालू स्थितीत झालेल्या खर्चास मंजूरी देण्यात येत असून मागील सर्व देणी देवून झाल्यावर तसेच आवश्यक त्या सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता झाल्यावर विश्वस्थ मंडळाच्या परवानगीने पुढील काम करण्यात यावे.

सुचक : मा. नंदकुमार गुजराथी
अनुमोदक : मा. ॲड. आनंदराव भोसले

हराव सर्वानुमते मंजूर

हराव क्र. ०४ " संस्थेच्या श्रीमान चंदुलाल शेट हायस्कुल व ज्युनिअर कॉलेजमधील विनाअनुदानित तुकडीवरील क्रमेने ०६ वाढीव खोल्यांच्या स्वतंत्र इमारतीसाठीचा प्लॅन संचालक मंडळाच्या मान्यतेने नगरपरिषदे कडून मंजूर करुन घेतला आहे. मात्र पावसाळा सुरु झाल्यामुळे पावसाळा संपल्यानंतर सदर इमारतीच्या बांधकामास सुरुवात करणेत यावी. सद्यास्थितीत सदर युनिटकडून संस्थेच्या खात्यात जमा असलेले रु. १२ लाख ८४ हजार हे बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये संस्थेच्या नांवे असलेल्या कर्जाच्या मुद्दल रकमेत जमा करणेत यावेत.

सुचक : मा. मंगेशभाई कुटाला
अनुमोदक :- मा. नंदकुमार गुजराथी

हराव सर्वानुमते मंजूर

हराव क्र. ०५. " आय. सी. एस. महाविद्यालयाच्या लेडीज हॉस्टेल मध्ये जाणाऱ्या रस्त्यावरील व परिसरातील पाण्याचा निचरा होण्यासाठी मातीचा भराव टाकणे, गटार काढणे, महाविद्यालयाच्या स्वच्छतागृहांसाठी स्वतंत्र टाकी बांधणे, परीसराची स्वच्छता करणे इ. कामांच्या पुर्ततेसाठी श्री. चंद्रकांत बाबु लाले यांच्याकडून आलेल्या कोटेशनला मंजूरी देण्यात येत असून सदर कामांची वेळेवर पुर्तता होणेसाठी श्री. नं. द. गुजराथी यांनी त्यात लक्ष घालावे अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

सुचक : मा. नंदकुमार गुजराथी
अनुमोदक :- मा. मंगेशभाई कुटाला

हराव सर्वानुमते मंजूर

हराव क्र. ०६. " संस्थेच्या इमारतीसह सर्व प्रॉपर्टीची नोंद मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच कार्यालयात होणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी तसेच पूर्ण झालेल्या सर्व

कागदपत्रांसह श्री. देवधर यांच्या मार्गदर्शना-
खाली पुढील तीन महिन्यांत हिशेब पूर्ण
करण्यात यावेत.

सुचक : मा. मंगेशभाई कुटाळ
अनुमोदक : मा. ना. क. शेलार

ठराव सर्वानुमते मंजूर

<u>ठराव क्र. ०७.</u>
आय. सी. एस. महाविद्यालयाच्या
लेडिज हॉस्टेल इमारतीच्या उर्वरित भागावर
शेड उभारण्यासाठी मे. फॅबकॉन इंजिनिअर्स
(प्रोप्रा. श्री. शेखर तलाठी) यांचेकडून
प्राप्त झालेले कोटेशनला मंजूरी देण्यात
येत आहे.

सुचक : मा. ना. क. शेलार
अनुमोदक : मा. नंदकुमार गुजराथी

ठराव सर्वानुमते मंजूर

०२. <u>सभेपुढील दुसरा विषय :-</u>
दि. १२.०५.२०१३ रोजीच्या
वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अनुषंगाने
वर्गणीदारांस नांव देणे कुणीतरी ज्यांनी देणगी
प्राप्त करून दिली आहे. अशा आठ
व्यक्तींना संस्थेचे सभासद करून घेणे
विषयी मंजूरी घेणे असा होता.
या संदर्भात जी व्यक्ति वर्गणी-
दारास नांव देईल अथवा देणगी देऊन
सभासदत्वाचे नांव सुचित करेल अशा
व्यक्तीस संस्थेचे सभासदत्व देण्यात यावे
असे यापूर्वी ठरविण्यात आले असल्याची
माहिती सभेपुढे देण्यात आली. या अनुषंगाने
१.) प्रा. सुरेश सिताराम नाके, २.) दत्ताराम
मनोहर शिंदे, ३.) श्री. संकेत प्रमोद कुटाळ,
४.) श्री. मितेश मंगेश कुटाळ, ५.) श्री. उत्तमकुमार
सुखराज जैन, ६.) श्री. सचिन शरद कुटाळ
७.) श्री. अजित चंद्रकांत कुटाळ, ८.) श्री. इंद्रजित
आनंदराव भोसले ९.) शेख आयुब मेहबुब
१०) सिद्धेश नंदकुमार गुजराथी

यांची नावे आली असून
संस्थेचे सदस्यत्व देणे आवश्यक असल्याचे
सांगितले त्यावर चर्चा करण्यात आल्यावर
पुढील ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०८
१. प्रा. सुरेश नाके २. श्री. दत्ताराम
मनोहर शिंदे. ३.) श्री. संकेत प्रमोद कुटाळ
४) श्री. मितेश मंगेश कुटाळ
५) श्री. उत्तमकुमार सुखराज जैन
६) श्री. सचिन शरद कुटाळ
७) श्री. अजित चंद्रकांत कुटाळ तसेच

८) श्री. इंद्रजित आनंदराव
९) शेख आयुब महबूब
१०) सिध्देश नंदकुमार गुजराथी

यांना संस्थेचे सभासदत्व देण्यात यावे.

सुचक : मा. मंगेशभाई कुडाला
अनुमोदक : मा. नंदकुमार गुजराथी

ठराव सर्वानुमते मंजूर

०३. सभेपुढील तिसरा विषय :
सन २०१४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख वेळ व ठिकाण निश्चित करणे असा होता.
या संदर्भात चर्चा करतांना पुढील ०३ महिन्यांत संस्थेच्या २०१४ च्या वार्षिक सर्व साधारण सभेचे आयोजित करणे आवश्यक असल्याचे सुचित करण्यात आले व त्यानुसार उपस्थितांमध्ये सविस्तर विचार-विनिमय करण्यात आल्यावर पुढील ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०९
"संस्थेच्या सन २०१४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यासंदर्भात तारीख, वेळ, आणि ठिकाण इ. निश्चित करण्याचे सर्वाधिकार संस्थेचे अध्यक्ष मा. हिराभाई कुडाला यांना देण्यात येत आहेत.

सुचक : मा. नंदकुमार गुजराथी
अनुमोदक :- मा. मंगेशभाई कुडाला

ठराव सर्वानुमते मंजूर

०४. सभेपुढील चौथा विषय :-
घटनेच्या कच्चा मसुदा मा. मदनभाई सुळ यांचेकडून आजतागायत प्राप्त झालेला नाहि त्यावर चर्चा करणे. असा होता.
या संदर्भात संस्थेच्या घटनेमध्ये दुरुस्ती करुन त्याचा कच्चा मसुदा तयार करण्यासाठी नियुक्ती करण्यात आलेल्या घटना समितीकडून अद्याप तसा मसुदा प्राप्त झाला नसल्याचे सभेपुढे सांगण्यात आले त्या अनुषंगाने चर्चा करण्यात आल्यावर पुढील ठराव करण्यात आला.

ठराव क्र. १०
" संस्थेच्या घटनेमध्ये आवश्यक त्या दुरुस्तीसह घटनेचा कच्चा मसुदा घटना समितीकडून मागवून घेण्यात यावा"

सुचक :- मा. ना. बा. शेलार
अनुमोदक :- मा. नंदकुमार गुजराथी

हराव सर्वानुमते मंजूर

०५. सभेपुढील पाचवा विषय :-
संस्थेस प्राप्त होणाऱ्या व यु.जी.सी. ग्रँट संबंधी झालेल्या खर्चाची माहिती घेणे.

यु.जी.सी. ग्रँट संबंधी माहिती देतांना संस्थेच्या आय.सी.एस. महाविद्यालयास यु.जी.सी.च्या ११ व्या योजनेअंतर्गत लेडिज हॉस्टेल, लायब्ररी इमारत, लॅबोरटरी इमारत, व्हॉलीबॉल ग्राऊंड, इनडोअर ट्रेनिंग सेंटरची इमारत वगळता सर्व इमारतींची बांधकामे पुर्ण झालेली असल्याचे सभेपुढे सांगण्यात आले. त्यावर उपस्थितीमध्ये चर्चा करण्यात येऊन पुढीलप्रमाणे हराव करण्यात आला.

हराव क्र. ११
"यु.जी.सी. कडून प्राप्त अनुदानातून संस्थेच्या आय.सी.एस. महाविद्यालयात पुर्णत्वास आलेल्या लेडिज हॉस्टेल, लायब्ररी इमारत, लॅबोरटरी इमारत, व्हॉलीबॉल ग्राऊंड, इत्यादी अत्याधुनिक सुविधांबाबत समाधान व्यक्त करण्यात येत असून इनडोअर ट्रेनिंग सेंटर इमारतीचे अपुर्ण असलेले बांधकाम पुर्ण करण्यासाठी यथायोग्य प्रयत्न करण्यात यावेत.

सुचक : मा. मंगेशभाई कुटाळ
अनुमोदक : मा. नंदकुमार गुजराथी

हराव सर्वानुमते मंजूर

६. सभेपुढील सहावा विषय :-
लेडिज हॉस्टेल सुरु करणेसंबंधी कार्यवाहीची माहिती घेवून हॉस्टेल सुरु करण्याची तारीख निश्चित करणे असा होता.

या संदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी.बी. सारंग यांनी लेडिज हॉस्टेल सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या कार्यवाहीची माहिती सभेपुढे सादर केली. त्यावर उपस्थितांनी विचारविनिमय केल्यावर पुढीलप्रमाणे हराव करणेत आला.

हराव क्र. १२.
"आय.सी.एस. महाविद्यालयात यु.जी.सी. अनुदानातुन उभारण्यात आलेले लेडिज हॉस्टेल सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या कार्यवाहीची पुर्तता करण्यात येवून दि. ०१ जुलै २०१४ पासून लेडिज हॉस्टेल प्रत्यक्षात सुरु करण्यात यावे.

सुचक :- मा. नंदकुमार गुजराथी
अनुमोदक :- मा. मंगेशभाई कुटाळ

हराव सर्वानुमते मंजूर

०७. सभेपुढील सातवा विषय :-

संस्थेने एम.बी.ए. कॉलेजसाठी पुणे येथील VIT या संस्थेबरोबर केलेल्या Joint venture ला मा. मदनभाई सुरा यांच्या सुचनेवरून पुढील ३ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती देणे असा होता.

या संदर्भात सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात संस्थेतर्फे एम.बी.ए. कॉलेजची सुरुवात करण्यात आली सदर एम.बी.ए. कॉलेजसाठी पुणे येथील विश्वकर्मा इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेसोबत ७ वर्षासाठी Joint venture करण्यात आले होते. तथापी सन २०१३ मध्ये मा. मदनभाई सुरा यांच्या सुचनेवरून सदर Joint venture मध्ये पुढील तीन वर्षासाठी वाढ करण्यात आली म्हणजेच सदर संस्थेबरोबर आपल्या संस्थेचे Joint venture २०१९ पर्यंत लागु राहिले. अशी माहिती सभेपुढे देण्यात आली.

०८. सभेपुढील आठवा विषय :-

एम.बी.ए. कॉलेज इमारतीसाठी च्या कर्जाबाबत सद्य स्थितीची माहिती देणे असा होता.

संस्थेच्या एम.बी.ए. कॉलेज इमारत बांधकामासाठी बँकेकडुन घेतलेल्या कर्जाबाबत माहिती देताना सदर कर्जापैकि इमारत



बांधकाम कर्ज ७० लाख आणि कॅश क्रेडिटपैकी २५ लाख असे एकुण ९५ लाख रु. देणे बाकी असल्याची माहिती सभेपुढे देण्यात आली. त्यावर विचार विनिमय करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करणेत आला.

ठराव क्र. ६३

एम.बी.ए. कॉलेज इमारतीच्या कर्जाची परतफेड लवकर होण्याच्या दृष्टीने संस्थेच्या सर्व शाखांकडून यथायोग्य प्रयत्न करण्यात यावेत.

सुचक : मा. ॲड. आनंदराव भोसले
अनुमोदक : मा. नंदकुमार गुजराथी

ठराव सर्वानुमते मंजुर

०९. सभेपुढील नववा विषय :

खेड नगर परिषदकडुन प्रतिवर्षीचे अनुदान बंद झाले आहे. त्यासंबंधी माहिती देणे.

याबाबत खेड नगरपरिषद प्रतिवर्षी आपल्या संस्थेस अनुदान देण्यात येत असे दरवर्षी संस्थेतर्फे अनुदान मंजुरीसाठी खेड नगरपरिषदला प्रस्ताव देण्यात येतो. यावर्षीहि तसा प्रस्ताव देण्यात आलेला आहे. तथापी सन २००८ नंतर संस्थेस नगरपरिषदेकडुन

अनुदान प्राप्त झाले नसल्याची माहिती सभेस देण्यात आली.

१०. सभेपुढील दहावा विषय :-
यु.जी.सी. मधील इनडोअर training centre चे काम वगळता UGC कडून आलेली ग्रॅंट व झालेल्या खर्च बाकीचे देणे यासंबंधी माहिती देणे.

यासंदर्भात माहिती देतांना UGC च्या ११ व्या योजनेअंतर्गत आय.सी.एस. कॉलेज साठी लेडिज हॉस्टेल, लायब्ररी इमारत प्रयोगशाळा इमारत हॉलीबॉल ग्राऊंड इ. इमारतीचे काम पूर्ण झाले असून विद्यापीठ समितीकडून त्यांची पहाणी करण्यात येऊन UGC कडून नो-ऑब्जेक्शन सर्टिफिकेटही प्राप्त झाली असल्याची सभेपुढे सांगण्यात आले. यावेळी लेडिज हॉस्टेल इमारत बांधकामापैकी कॉन्ट्रॅक्टरचे रु. ४,५४,५१९ रुपये देणे बाकी असल्याचे सांगण्यात आले. ~~यावेळी लेडिज हॉस्टेल इमारत बांधकामापैकी~~ त्याचप्रमाणे इनडोअर ट्रेनिंग सेंटर इमारतीसाठीचे रु. ३ लाख अनुदान प्राप्त होणे बाकी असल्याचे सांगण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. १४.
UGC कडून आय.सी.एस. महाविद्यालयासाठी लेडिज हॉस्टेल, ग्रंथालय प्रयोगशाळा इ. इमारती तसेच हॉलीबॉल ग्राऊंड इ. सुविधांसाठी UGC चे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले ही उल्लेखनीय बाब असून लेडिज हॉस्टेल इमारतीचे कॉन्ट्रॅक्टरचे देणे असलेल्या रकमेची तरतूद लवकरात लवकर करण्यात यावी त्याचप्रमाणे इनडोअर ट्रेनिंग सेंटरच्या इमारतीसाठी UGC कडून येणे असलेल्या रकमेसाठी आवश्यक तो ~~पाठपुरावा~~ पाठपुरावा करण्यात यावा.

सुचक :- मा. नंदकुमार गुजराथी
अनुमोदक :- मा. ॲड. आनंदराव भोसले

ठराव सर्वानुमते मंजूर

११. सभेपुढील अकरावा विषय :-
मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे अन्य विषय असा होता.

आयत्या वेळच्या अन्य विषयांत संस्थेच्या भविष्यकालीन प्रगतीच्या दृष्टीने चर्चा करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे सुचना व मार्गदर्शन करण्यात आले.

१.) आय.सी.एस. कॉलेज इमारत भाडे व सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात जमा होणाऱ्या इमारती निधीच्या रकमेतून

मु० जी० सी. कडील देणी भागविण्यात यावीत.

०२.) एम. बी. ए. कॉलेजच्या कार्यालयातून संस्थेशी संबंधीत असलेली सुरुवाती-पासूनची सर्व कागदपत्र संकलित करुन ती संस्थेच्या कार्यालयात ठेवण्यात यावीत.

०३) सन २०१४/१५ या शैक्षणिक वर्षापासून एम. बी. ए. कडून बँकेकडील कर्जाची मुदद्दल भरण्यासाठी साडेबारा लाख व इतर युनिटस कडून साडेबारा लाख रुपयांची तरतुद केल्यास पुढील चार वर्षात बँकेचे कर्ज संपुन जावु शकेल.

०४) विद्यमान चेअरमन यांना पुढील आर्थीक धोरणाची कल्पना यावी व काम-काजात काहि त्रुटी राहू नयेत म्हणून त्यांच्यासोबत स्वतंत्र मिटिंगचे आयोजन करण्यात यावे. सदर मिटिंगला मा. अध्यक्ष सेक्रेटरी व खजिनदार यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन करावे.

०५.) संस्थेचे विश्वस्त मा० उल्हासभाई शेट हे मागील पाच वर्षात कोणत्याहि सभेला हजर राहिले नाहित याबाबत जनरल मिटिंगमध्ये विचारविनिमय करणे.



०६.) मा० उप धर्मादाय आयुक्त सौ. सुनिता तराळ यांनी नुकतीच संस्थेस भेट दिली असता एका संस्थेने दुसऱ्या संस्थेजवळ Joint venture करतांना त्यांची परवानगी घेणे आवश्यक असल्याचे सुचित केले. यासंदर्भात श्री. मदनभाई खुरा यांनी श्री. नं. द. गुजराथी यांचेजवळ सदर परवानगी नंतर घेणार असल्याबद्दल सांगितले असल्याची माहिती सभेपुढे देण्यात आली.

वरिलप्रमाणे विषयपत्रिकेवरील सर्व विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आल्यावर चहापान होवून ही सभा संपन्न झाली.

(सही)
सेक्रेटरी
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)

(सही)
अध्यक्ष
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)

सहजीवन शिक्षण संस्था, खेड
विश्वस्त मंडळ सभा दि०१९.१२.२०१४

स्थळ :- आय.सी.एस. महाविद्यालय
वेळ :- दुपारी ३.०० वाजता.

इतिवृत्त

सहजीवन शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मंडळाची सभा शुक्रवार दिनांक १९.१२.२०१४ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता संस्थेच्या आय.सी.एस. महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. सभेस खालीप्रमाणे सभासद उपस्थित होते.

०१. मा. हिराचंद प. कुवला
०२. मा. नंदकुमार द. गुजराथी
०३. मा. मंगेश प. कुवला

सभेच्या सुरुवातीला अध्यक्ष मा. हिराभाई कुवला यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

०१ सभेपुढील पहिला विषय - मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजुरी देणे असा होता.

यासंदर्भात सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुवल यांनी विश्वस्त मंडळाच्या मागील दिनांक २०.०५.२०१४ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखविले.
सदर इतिवृत्ताच्या पुर्तताबाबतचा आढावा

घेतांना पुढीलप्रमाणे सुचना व मार्गदर्शन करण्यात आले.

१. आय. सी. एस. महाविद्यालयातील B.Sc (IT) BMS, BCS, या विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी बांधण्यात येत असलेल्या नविन इमारतींची पाण्याची टाकी ही स्वच्छता गृहांपासुन दुर असावी.

२. महाविद्यालयासाठी बांधण्यात येत असलेल्या सर्व नविन इमारतींची नोंद ग्रामपंचायतीकडे करण्यात येवुन ग्रामपंचायतीकडुन सर्व इमारतींवर नंबर टाकुन घेण्यात यावेत.

३. संस्थेच्या नविन मालमत्तेची नोंद मा. धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात करण्यात यावी.

४. आय. सी. एस. महाविद्यालयाच्या ज्या इमारतींचे भाडे क्लेम करण्यात येत नाही. अशा इमारतींचे PWD कडुन Valuation करुन भाडेप्रमाणपत्र घेण्यात यावी.

मागील सभेच्या इतिवृत्ताचा सविस्तर आढावा घेण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करणेत आला.

ठराव क्र. ०१

"सहजीवन शिक्षण संस्थेच्या मागील दिनांक २०.०५.२०१४ रोजी संपन्न झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात येत आहे.

सुचक :-
अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर



०२. सभेपुढील दुसरा विषय - मागील सभेपासुन आजपर्यंत विविध शाखा व संस्था यांच्या झालेल्या खर्चास मंजुरी देणे असा होता.

यासंदर्भात विश्वस्त मंडळाच्या मागील सभेपासुन आजतागायत संस्थेचे श्रमिक चंदुलाल शेट हायस्कूल, आय. सी. एस. कॉलेज इ. शाखांमध्ये विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी त्याचप्रमाणे शैक्षणिक सुविधा निर्माण करण्यासाठी झालेल्या खर्चाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात आली. त्यावर चर्चा करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०२

~~सं~~संस्थेच्या विश्वस्त मंडळाच्या मागील सभेपासुन आजपर्यंत संस्थेच्या विविध शाखांच्या व संस्थेच्या प्रगतीसाठी करण्यात आलेल्या खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. नंदकुमार द. गुजराथी
अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

०३. सभेपुढील तिसरा विषय - संस्थेतर्फे करण्यात आलेल्या नविन बांधकामाची माहिती घेणे असा होता.

यासंदर्भात चालु वर्षात संस्थेच्या

आय. सी. एस. महाविद्यालयातील B.Sc.(IT),
BMS आणि BCS या विनाअनुदानित अभ्यास-
क्रमांसाठी बांधण्यात येत असलेल्या स्वतंत्र
इमारतीच्या बांधकाम प्रगतीचा आढावा घेण्यात
आला. सद्य परिस्थितीत सदरच्या इमारतीचा
तळमजला व पहिला मजला यांचे बांधकाम
पुर्ण झाले असुन दोन्ही मजल्याची लादी,
खिडक्या, दरवाजे, मागील बाजुचे प्लास्टर,
रंगकाम, इलेक्ट्रीफिकेशन इ. कामे होणे बाकी आहे.
त्याचप्रमाणे श्रीमान चंदुलाल शेट हाय. साठी वाढीव
इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आले असल्याचे
सांगण्यात आल्यावर पुढील ठराव करणेत आला.

ठराव क्र. ०३.

"आय. सी. एस. महाविद्यालयातील, B.Sc.(IT),
BMS तसेच BCS या विनाअनुदानित अभ्यास-
क्रमांसाठी उभारण्यात येणाऱ्या स्वतंत्र इमारतीचे
उर्वरित बांधकाम, तसेच श्रीमान चंदुलाल शेट
हायस्कुल व ज्युनिअर कॉलेजसाठी आवश्यक
असलेले वाढीव वर्गखोल्यांसाठीचे बांधकाम
हे निधीच्या उपलब्धतेप्रमाणे टप्प्या टप्प्याने
पुर्ण करण्यात यावे.

सुचक :-
अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

०४. सभेपुढील चौथा विषय - संस्थेच्या MBA.
कॉलेज इमारतीसाठी बँकेकडुन घेतलेल्या कर्जाच्या
सद्यस्थितीची माहिती घेणे व कर्जपरतफेड-
संदर्भातील तरतुदीविषयी चर्चा करणे असा होता.
याबाबत माहिती देतांना संस्थेच्या MBA.
कॉलेज इमारतीसाठी बँकेकडुन घेण्यात आलेल्या
कर्जापैकी आज्ञामितीस टर्म लोनचे ४२,५७,५२५/-
तर कॅश क्रेडीटचे २५,३०,९९३/- असे एकुण
६७,८८,५१८ इतक्या कर्जाची परतफेड होणे
बाकी असल्याचे सभेपुढे सांगण्यात आले.
यासंदर्भात उपस्थितांमध्ये सविस्तर चर्चा
करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करणेत
आला.

ठराव क्र. ०४

संस्थेने MBA कॉलेज इमारत बांधकामासाठी
बँक ऑफ महाराष्ट्र कडुन घेतलेल्या कर्जाची परतफेड
होवून शक्य तितक्या लवकर संस्था कर्जमुक्त
होण्याच्यादृष्टीने संस्थेच्या सर्व विभागांकडुन
आर्थिक तरतुद करण्यात यावी. व कर्जफेडी-
च्यादृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत.

सुचक :-
अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

०५. सभेपुढील पांचवा विषय- आय.सी.एस. महाविद्यालयाच्या वर्गखोल्यांना नांवे देण्या-संदर्भात रक्कम निश्चित करणे असा होता.
याबाबत आय.सी.एस. महाविद्यालयातील ज्या वर्गखोल्यांना नांवे देणे बाकी आहे अशा वर्गखोल्यांबाबतची माहिती सभेपुढे सादर करण्यात आली. त्यावर उपस्थितांनी सविस्तर चर्चा केल्यानंतर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र.०५

"आय.सी.एस. महाविद्यालयाच्या उपलब्ध असलेल्या वर्गखोल्यांना नांवे देण्यासाठी दात्यांकडून प्राप्त झालेल्या देणगीनुसार संबंधीत दात्यांनी सुचित केलेले नांव संबंधित वर्गखोलीला देण्यात यावे.

सुचक:-
अनुमोदक:-

ठराव सर्वानुमते मंजूर

०६. सभेपुढील सहावा विषय- संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख निश्चित करणे असा होता.
या विषयासंदर्भात चर्चा करतांना संस्थेची सन २०१३ची सभा आयोजित करण्यात आली नसल्याबद्दल सभेला माहीती देण्यात आल्यावर सदर सभेचे लवकरात लवकर आयोजन करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.



ठराव क्र.०६

"रविवार दिनांक ०४ जानेवारी २०१५ रोजी सायं.ठिक ४.०० वाजता आय.सी.एस. महावि-द्यालयात सहजीवन शिक्षण संस्थेच्या सन २०१३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात यावे.

सुचक:-
अनुमोदक:-

ठराव सर्वानुमते मंजूर

०७. सभेपुढील सातवा विषय लेडीज हॉस्टेल उद्घाटनाची तारीख निश्चित करणे असा होता.
यासंदर्भात चर्चा करतांना चालु वर्षीचे महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाचे वार्षिक अधिवेशन दि. २४ जानेवारी रोजी आपल्या आय.सी.एस. महाविद्यालयात आयोजित करण्यासंदर्भातील प्रस्ताव आला असल्याची माहिती संस्थाध्यक्ष मा. हिराभाई कुयला यांनी सभेपुढे दिली व सदर अधिवेशनासाठी महाराष्ट्र राज्याचे उच्च

शिक्षणमंत्री मा. ना. विनोदजी तावडे हे उपस्थित रहाणार असल्याचे सभेपुढे सांगण्यात आले.

त्याचवेळी संस्थेच्या वतीने मा. नामदार रामदासभाई कदम यांना निमंत्रित करण्या- संदर्भात सुचित करण्यात आल्यावर पुढील ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०७

"दिनांक २४ जानेवारी २०१५ रोजी अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या अधिवेशनासाठी मा. नामदार विनोदजी तावडे यांची उपस्थिती निश्चित झाल्यास त्यांच्या शुभहस्ते व मा. नामदार रामदासभाई कदम यांच्या अध्यक्षतेखाली आय. सी. एस. महाविद्यालयाच्या लेडीज हॉस्टेल इमारतीचा उद्घाटन समारंभ करण्यात यावा.

सुचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

०८ सभेपुढील ०८ वा विषय - ग्रंथपाल पदाविषयी आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीची माहीती घेणे असा होता.

यासंदर्भात आपल्या आय. सी. एस. महाविद्यालयातील ग्रंथपाल श्री. एस. पी. जोशी यांच्या पदास विद्यापीठाची मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव यापुर्वीच पाठविण्यात आला आहे. मात्र कॉलेजकडून वारंवार प्रयत्न करुनही त्यास मंजुरी मिळू शकली नाही. याबाबत श्री. जोशी यांनाही वैयक्तिक प्रयत्न करुन संबधीत मंजुरी आणण्यासाठी मुभा देण्यात आली होती. तथापी अद्याप सदर मंजुरी प्राप्त होवु शकली नाही. अशी माहीती सभेपुढे देण्यात आली. तसेच पुर्णवेळ ग्रंथपाल पद भरलेले नसल्यामुळे महाविद्यालयाचे नॅक मानांकन तसेच इतर श्रेणी निश्चितीच्या वेळी होणाऱ्या संभाव्य अडचणींबाबत चर्चा करण्यात आल्यावर पुढील ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०८

"आय. सी. एस. महाविद्यालयात ग्रंथपाल पदावर श्री. जोशी यांच्या नियुक्तीस मान्यता मिळण्यासाठी विद्यापिठाकडे वारंवार प्रयत्न करुनही यश येत नाही त्यामुळे महाविद्यालयाच्या नॅक मानांकनास व तत्सम महत्वाच्या कामांमध्ये निर्माण होणाऱ्या अडचणींचा विचार करता ग्रंथपाल पद नव्याने भरण्यासंदर्भातील आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

सुचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

०९ सभेपुढील नववा विषय - प्राचार्य पदाबा.

दिलेल्या जाहिरातीविषयीची पुढील माहिती देणे असा होता.

यासंदर्भात संस्थेच्या आय. सी. एस. महाविद्यालयात नियमित प्राचार्यांची नियुक्ती होण्याकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देवून अर्ज मागविण्यात आले होते. मात्र विहित मुदतीत एकाही उमेदवाराच्या अर्ज संस्थेकडे प्राप्त झाला नसल्याची माहिती सभेपुढे देण्यात आली, त्या अनुषंगाने चर्चा करण्यात आल्यावर पुढील ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०९

"संस्थेच्या आय. सी. एस. महाविद्यालयात प्राचार्य पदावर नियुक्ती करण्यासाठी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांच्या कार्यालयात पुनःश्च नाहरकत दाखला मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यात यावा व यासंदर्भातील पुढील आवश्यक त्या कार्यवाहीची तातडीने पुर्तता करण्यात यावी.

सुचक :-
अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

१०. सभेपुढील दहावा विषय - घटनादुरुस्ती संदर्भात आलेल्या कच्चा मसुदयास मंजुरी देणे असा होता.

यासंदर्भात संस्थेच्या सध्या वापरात असलेल्या घटनेप्रमाणे अंमलबजावणी करतांना काही मुद्यांसंदर्भात तांत्रिक अडचणी निर्माण होत असतात अशा मुद्यांमध्ये दुरुस्ती केलेला मसुदा सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुयला यांनी सभेपुढे सादर केला. त्यावर विचारविनिमय करतांना सदर घटनादुरुस्तीसंदर्भात आवश्यकता भासल्यास तज्ञ व्यक्तींचा सल्ला घेण्याबाबत सुचित करण्यात आले. व त्यानंतर पुढीलप्रमाणे ठराव करणेत आला.

ठराव क्र. १०

" संस्थेच्या घटनेत आवश्यक तेथे दुरुस्ती करण्यासंदर्भात तयार करण्यात आलेला कच्चा मसुदा संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात यावा.

सुचक :-
अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

११. सभेपुढील ११ वा विषय - मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे अन्य विषय असा होता.

यासंदर्भात संस्थेच्या आय. सी. एस. महावि-
द्यालयाचे सन २०१४-१५ हे रौप्य महोत्सवी
वर्ष असल्याची माहिती सभेपुढे देण्यात
आली त्या अनुषंगाने चर्चा करतांना रौप्य
महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी संबंधितांकडून
पुढील योग्य ते नियोजन करण्यात यावे असे
सर्वानुमते ठरविण्यात आले.

आयत्या वेळच्या पुढील विषयाबाबत चर्चा
करतांना अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर
कर्मचारी महासंघाचे चालू वर्षातील वार्षिक
अधिवेशन आपल्या आय. सी. एस. महाविद्याल-
यात आयोजित करण्यासंदर्भातील प्रस्ताव
संबंधित पदाधिकाऱ्यांकडून आला असल्याची
माहिती सभेला देण्यात आली. सदर अधि-
वेशनाची रूपरेषा व स्वरूप समजावून घेण्यात
आल्यावर सदर अधिवेशन घेण्यास संमती
असल्याचे उपस्थितांकडून सांगण्यात आले.

वरीलप्रमाणे विषयपत्रिकेवरील सर्व विष-
यांवर सविस्तर चर्चा करण्यात आल्यानंतर
सेक्रेटरी मा. मंगेशभाई बुटाला यांनी उपस्थितांचे
आभार मानले व चहापान होवून ही सभा
संपन्न झाली.

सेक्रेटरी
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)

अध्यक्ष
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)



सहजीवन शिक्षण संस्था, खेड
विश्वस्त मंडळ सभा दि. १०.०२.२०१५

स्थळ :- आय. सी. एस. कॉलेज, खेड
वेळ :- ठीक सायं. ४.०० वा.

## इतिवृत्त

सहजीवन शिक्षण संस्थेच्या विश्वस्त
मंडळाची सभा मंगळवार दि. १०/०२/२०१५
रोजी सायं. ठीक ४.०० वा. संस्थेच्या
आय. सी. एस. कॉलेजमध्ये आयोजित
करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे
विश्वस्त हजर होते.

०१. मा. हिराचंद प. बुटाला
०२. मा. नंदकुमार द. गुजराथी
०३. मा. मंगेशभाई बुटाला
०४. मा. विलासभाई बुटाला

निमंत्रित

०१. मा. ॲड. आनंदराव भोसले
०२. मा. ना. बा. शेलार
०३. प्राचार्य डॉ. डी. बी. सारंग

सभेच्या सुरुवातीला अध्यक्ष
मा. हिराभाई बुटाला यांनी उपस्थितांचे
स्वागत केले. व सभेच्या कामकाजास
सुरुवात करण्यात आली.

०१. सभेपुढील पहीला विषय :-
मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजूरी देणे असा होता.
यासंदर्भात संस्थेचे सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुटाळ यांनी संस्थेच्या मागील दिनांक १९.१२.२०२४ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखविले. सदर इतिवृत्ताच्या पुर्ततेबाबत उपस्थितांमध्ये सविस्तर विचार-विनिमय करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०१.
"सहजीवन शिक्षण संस्थेच्या मागील दि. १९.१२.२०२४ रोजी संपन्न झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- मा. मंगेशभाई कुटाळ
अनुमोदक :- मा. ॲड. आनंदराव भोसले

ठराव सर्वानुमते मंजूर

०२. सभेपुढील दुसरा विषय :-
रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत संस्थेच्या वतीने मतदान करणेकरीता



प्रतिनिधी नियुक्त करणे असा होता.
यासंदर्भात रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या होवू घातलेल्या निवडणुकीत संस्थेच्या वतीने मतदान करण्यासाठी प्रतिनिधी नियुक्त करणे आवश्यक असल्याचे मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोकण विभाग नवी मुंबई यांच्या कार्यालयाकडून पत्राद्वारे संस्थेला कळविणेत आले असल्याची माहिती सभेला देण्यात आली. त्यावर उपस्थितांमध्ये सविस्तर विचारविनिमय करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करणेत आला.

ठराव क्र. ०२.
रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या होवू घातलेल्या निवडणुकीत सहजीवन शिक्षण संस्थेच्या वतीने मतदान करणेकरीता संस्थेचे प्रतिनिधी म्हणून सेक्रेटरी श्री. मंगेशभाई परशुराम कुटाळ यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

Seen [signature]

सुचक :- मा. नंदकुमार गुजराथी
अनुमोदक :- मा. विलासभाई कुटाळ

ठराव सर्वानुमते मंजूर

०३. यानंतर पुढील तिसरा विषय :-
मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळेचे विषय असा होता.
या दृष्टिकोनातून पुढील पाच वर्षासाठी नवीन आलेल्या सर्व विश्वस्तांनी वेळोवेळी सहकार्य करुन संस्थेच्या प्रगतीस दृष्टिकोनाने लक्ष द्यावे.
वरीलप्रमाणे विषयपत्रिकेवरील सर्व विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आल्यावर चहापान करुन हि सभा संपन्न झाली.

Mulala
सेक्रेटरी
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)

[signature]
अध्यक्ष
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)



सहजिवन शिक्षण संस्था, खेड
विश्वस्त मंडळ सभा दि. २८.०२.२०१५

स्थळ :- मा. मंगेशभाई कुयला
यांचे निवासस्थान
वेळ :- सायं. ७.०० वाजता

इतिवृत्त

सहजिवन शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मंडळाची सभा शनिवार दि. २८.०२.२०१५ रोजी संस्थेचे सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुयला यांच्या निवासस्थानी सायं. ठिक ७.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे विश्वस्त उपस्थित होते.
०१. मा. नंदकुमार द. गुजराथी
०२. मा. विलासभाई कुयला.
०३. मा. डॉ. उपेंद्र जी. तलाठी
०४. मा. मंगेशभाई कुयला.

निमंत्रित

०१. मा. ॲड. आनंदराव भोसले
०२. मा. किशोर गांधी
०३. मा. संजय व. मोदी
०४. डॉ. जी. व्ही. सारंग

सभेच्या सुरुवातीला सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुयला यांनी उपस्थितांचे

हार्दिक स्वागत केले व सभेच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात करणेपूर्वी आपल्या संस्थेचे उपाध्यक्ष मा. मनोहर शंकर गुजराथी उर्फ आण्णा गुजराथी यांचे नुकतेच वृध्दापकाळाने निधन झाले. कै. आण्णांनी संस्थेच्या स्थापनेपासून संस्थेच्या प्रगतीत बहुमोल योगदान दिलेले असून त्यांच्या आपणामधून जाण्याने संस्थेचे खूप नुकसान झाले असल्याचे सभेपुढे नमुद करण्यात आल्यावर सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्धता पाळून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

०१. सभेपुढील पहिला विषय - मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजुरी देणे असा होता.

त्यानुसार सेक्रेटरी मा. मंगेशभाई लुथरा यांनी विश्वस्त मंडळाच्या मागील दि. १९.१२.२०१४ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखविले. सदर इतिवृत्ताच्या पुर्तताबाबत सविस्तर आढावा घेण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करणेत आला.

ठराव क्र. ०१

"सहजीवन शिक्षण संस्थेच्या, मागील दि. १९.१२.२०१४ रोजी संपन्न झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देणेत ~~येणे~~ येत आहे.

सुचक :-

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजूर



०२ सभेपुढील दुसरा विषय - नविन विश्वस्त मंडळाचे स्वागत करणे असा होता.

त्यानुसार सहजीवन शिक्षण संस्थेच्या सन २०१५ ते २०२० च्या कालावधीकरीता नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या सर्व विश्वस्तांचे स्वागत करण्यात येवून त्यांना त्यांच्या भविष्यकालीन कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

०३ सभेपुढील तिसरा विषय - पुढील शैक्षणिक वर्षापासून संस्थेच्या "विश्वकर्मा सहजीवन इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट" अंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न नविन कोर्सेस सुरु करण्याविषयी विचारविनिमय करून निर्णय घेणे असा होता.

यासंदर्भात आपल्या संस्थेच्या विद्यमाने सुरु असलेल्या विश्वकर्मा सहजीवन इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट या इन्स्टिट्युटमध्ये MMS या नियमित अभ्यासक्रमाबरोबरच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न B.Sc. (Fashion Disigning) B.Sc. (Animation) व M.Sc. (Information Technology) हे कोर्सेस सुरु केल्यास तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी एक चांगला पर्याय निर्माण होवू शकतो अशी माहिती सभेपुढे देण्यात आली. त्याप्रमाणे सदर कोर्सेस-

बाबतच्या उपलब्ध माहितीनुसार या प्रत्येक कोर्सची संलग्नता फी रुपये ५५,००० सह संबंधित विद्यापीठाकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवावे लागतील. असे सांगण्यात येवून सदर प्रत्येक कोर्सची वार्षिक फी रु. ३५,००० प्रती विद्यार्थी असल्याचे सांगण्यात येवून सदरचे कोर्सेस हे सध्या VIT, पुणे या संस्थेतर्फे चालविण्यात येते असून त्यास चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती सभेपुढे देण्यात आली. त्या अनुषंगाने उपस्थितांमध्ये चर्चा करतांना आपल्या आय.सी.एस. महाविद्यालयात सध्या ही B.Sc (Information Technology) हा नियमित अभ्यासक्रम सुरु असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना पुढील पदव्युत्तर शिक्षणासाठी M.Sc. (Information Technology) हा अभ्यासक्रम उपयोगी ठरु शकेल अशी माहिती डॉ. उपेंद्र तलाठी यांनी सभेला दिली. यावर विचारविनिमय करण्यात आल्यावर पुढील ठराव करणेत आला.

ठराव क्र. ०३

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून संस्थेच्या विश्वकर्मा सह्जीवन इन्स्टीट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट या इन्स्टिट्युट अंतर्गत कनाटिक स्टेट ओपन युनिव्हर्सिटीशी संलग्न असलेले B.Sc. (Fashion Disigning) B.Sc. (Animation) हे तीन वर्ष कालावधीचे पदवी अभ्यासक्रम तर M.Sc. (Information Technology) हा दोन वर्ष कालावधीचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तथापी सदर विद्यापीठाअंतर्गत अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर संबंधित विद्यार्थी हा त्यापुढील शिक्षणासाठी महाराष्ट्रातील इतर विद्यापीठात प्रवेश घेण्यास पात्र ठरणे आवश्यक आहे. तरी याबाबत खात्री करुन घेण्यात यावी. तसेच सदर कोर्सेस सुरु करण्यासाठी आवश्यक असलेली संलग्नता फी आणि त्या अनुषंगाने नियमानुसार आवश्यक असलेला इतर प्रशासकीय खर्च हा विश्वकर्मा सहजीवन इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट" या इन्स्टिट्युट मार्फत करण्यात यावा.

सुचक :- डॉ. उपेंद्र डी. तलाठी
अनुमोदक :- श्री. विलास प. कुयल

ठराव सर्वानुमते मंजुर

०४ सभेपुढील चौथा विषय - संस्थेच्या आय.सी.एस. कॉलेजचे रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करण्याविषयी नियोजन करणे असा

होता.

या संदर्भात चालू शैक्षणिक वर्ष हे आपल्या संस्थेच्या आय. सी. एस. महाविद्यालयाचे २५ वे म्हणजेच रौप्य महोत्सवी वर्ष असल्याची माहिती सभेपुढे देण्यात आली व हे रौप्य महोत्सवी वर्ष विविध कार्यक्रमांद्वारे साजरे करण्याची संकल्पना उपस्थितांसमोर मांडण्यात आली. त्यानुसार नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०३

"संस्थेच्या आय. सी. एस. महाविद्यालयाचे रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करताना माहे जुलै २०१५ ते जानेवारी २०१६ या कालावधीत दर महिन्याला विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करणे, स्मरणिका प्रकाशित करणे, माजी विद्यार्थ्यांना आवाहन करणे, साजरे करावयाच्या कार्यक्रमांची रूपरेषा निश्चित करणे, वर्तमानपत्र, लोकल ऑफ केबल नेटवर्कद्वारे प्रसिद्धी देणे याकरिता नियोजन करण्यासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक मुख्य कमेटी तयार करण्यात यावी. व या कमेटीच्या अंतर्गत विषयानुरूप उपसमित्या तयार करण्यात याव्यात व रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करावयाच्या विविध



कार्यक्रमांचे नियोजन करून त्यास योग्य ती प्रसिद्धी देण्यात यावी.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

वरीलप्रमाणे विषयपत्रिकेवरील सर्व विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आल्यावर आय. सी. एस. महाविद्यालयाच्या गव्हर्निंग कौन्सिलचे चेअरमन ॲड. आनंदराव भोसले यांनी उपस्थितांचे आभार मानले व ही सभा संपन्न झाली.

सेक्रेटरी
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)

अध्यक्ष
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)

सञ्जीवन शिक्षण संस्था (238)

विश्वस्त मंडळ सभा दि. १८.१२.२०१५

स्थळ:- आय.सी.एस. कॉलेज

वेळ:- सायं.५.३० वा.

## इतिवृत्त

सञ्जीवन शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मंडळाची सभा गुरुवार दि.१८.१२.२०१५ रोजी सायं. ठीक ५.३० वा. संस्थेच्या आय.सी.एस. महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे विश्वस्त उपस्थित होते.

१. मा. हिराचंद प. कुटाळा
२. मा. नंदकुमार द. गुजराथी
३. मा. विलास प. कुटाळा
४. मा. डॉ. विजयभाई मेहता.- निमंत्रित
५. मा. मंगेश प. कुटाळा

निमंत्रित
१. मा. नामदेव बा. बेलार
२. मा. डॉ. संजीव ना. धारिया
३. मा. डॉ. डी. बी. सारंग

सभेच्या सुरुवातीला अध्यक्ष मा. हिराभाई कुटाळा यांनी उपस्थित सर्व विश्वस्तांचे हार्दिक स्वागत केले व त्यानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

०१. सभेपुढील पहिला विषय :-
मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्यांस मंजुरी देणे असा होता.

या संदर्भात सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुडाळा यांनी मागील दि. २८.०२.१५ रोजी संपन्न झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. सदर इतिवृत्ताच्या पुर्ततेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०१.
" सहजीवन शिक्षण संस्थेच्या मागील दि. २८.०२.२०१५ रोजी संपन्न झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात येत आहे.

सुचक :-
अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

०२. सभेपुढील दुसरा विषय :- संस्थेच्या आय.सी.एस. महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त केलेल्या कार्यवाहिचा आढावा घेणे असा होता.

या संदर्भात संस्थेतर्फे दि. २९ जानेवारी रोजी होणाऱ्या मुख्य कार्यक्रमासह पुढील महिनाभरात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती संस्थाध्यक्ष मा. हिराभाई कुडाळा यांनी उपस्थितांना दिली. त्याचप्रमाणे या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त निधी संकलनाचा भाग म्हणून संस्थेतर्फे वर्ग खोल्यांना नांव देण्यासाठी दाते मिळविण्याकरीता सर्व सभासदांनी प्रयत्न करून हा रौप्य महोत्सव अधिक चांगल्याप्रकारे पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले.

या अनुषंगाने उपस्थितांमध्ये सविस्तर विचारविनिमय करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०२.
"आय.सी.एस. महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रम यथासांग पार पाडण्यासाठी निधी संकलन प्रक्रियेमध्ये सर्व सभासदांकडून सक्रिय सहभाग देण्यात यावा त्याचप्रमाणे नियोजित कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी सर्वांकडून जाणिवपूर्वक प्रयत्न करण्यात यावेत.

सुचक :-
अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

०३. सभेपुढील तिसरा विषयः- वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख निश्चित करणे असा होता.

यासंदर्भात संस्थेच्या चालू वर्षातील वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करणे आवश्यक असल्याबाबत चर्चा करण्यात आली व त्यानुसार खालील-प्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०३.

"रविवार दि. ०३.०९.२०२५ रोजी सांय ठिक ४.०० वा. आय. सी. एस. महाविद्यालयाच्या ग्रंथालय इमारतीच्या सभागृहात संस्थेच्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात यावे.

सुचकः-
अनुमोदकः-

ठराव सर्वानुमते मंजूर

०४. सभेपुढील चौथा विषयः- संस्थेकडून आतापर्यंत झालेल्या खर्चास मंजूरी देणे असा होता.

या विषयासंदर्भात संस्थेकडून मागील सभेपासून आजपर्यंत हायस्कूल व ज्युनि. कॉलेज, आय. सी. एस. महाविद्यालय एम. बी. ए. कॉलेज तसेच आय. टी. विभाग इ. च्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने करण्यात आलेल्या खर्चाची माहिती सभेपुढे आली व सदरच्या खर्चामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ पीण्याचे पाणी, टॉयलेटस, खेळाचे मैदान, परीसराचे सुशोभिकरण इ. साठी खर्च करण्यात आले असल्याचे सभेपुढे सांगण्यात आल्यावर पुढील ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०४.

'संस्थेच्या विविध विभागांच्या शैक्षणिक विकासासाठी व विद्यार्थ्यांच्या आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थेकडून आजपर्यंत करण्यात आलेल्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सुचकः
अनुमोदकः

ठराव सर्वानुमते मंजूर

०५. सभेपुढील पाचवा विषयः- बँक ऑफ महाराष्ट्रकडील कर्जासंबंधी विचारविनिमय करणे असा होता.

यासंदर्भात संस्थेच्या नांवे बँक ऑफ महाराष्ट्रकडून घेण्यात आलेल्या कर्जाच्या परतफेडीबाबतचा आढावा घेवून कर्जाच्या सद्यस्थितीची माहिती सभेपुढे देण्यात आली. व त्या अनुषंगाने चर्चा करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करणे

आला.

ठराव क्र. ०५.
संस्थेच्या नांवे बँक ऑफ महाराष्ट्र कडे असलेल्या कर्जाची परतफेड लवकरात लवकर होवून संस्था कर्जमुक्त होण्याच्यादृष्टीने येत्या मार्च अखेरपर्यंत संस्थेचे हायस्कूल, आय. सी. एस. महाविद्यालय, एस. बी. ए. कॉलेज तसेच आय. टी. विभाग इ. विभागांकडून संस्थेकडे वर्ग होवू शकेल ती रक्कम संस्थेकडे वर्ग करून ती कर्ज खात्यात भरण्यात यावी.

सुचक :
अनुमोदक :

ठराव सर्वानुमते मंजूर

वरीलप्रमाणे सभेपुढील सर्व विषयांवर सविस्तर विचारविनिमय करण्यात आल्यावर संस्थेचे सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुवळा यांनी उपस्थितांचे आभार मानले व चहापान होवून ही सभा संपन्न झाली.

सेक्रेटरी
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)

अध्यक्ष
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)



सहजीवन शिक्षण संस्था
विश्वस्त मंडळ सभा दि. 26.03.2016

स्थळ :- आय. सी. एस. कॉलेज
वेळ :- सायं. 4.30 वा.

## इतिवृत्त

सहजीवन शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मंडळाची सभा शनिवार दिनांक :- 26.03.2016 रोजी सायं. ठीक 4.30 वाजता संस्थेच्या आय. सी. एस. महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे विश्वस्त उपस्थित होते.

०१. मा. हिराचंद प. कुवळा
०२. मा. नंदकुमार द. गुजराथी
०३. मा. डॉ. उपेंद्र डी. तलाठी
०४. मा. विलास प. कुवळा
०५. मा. मंगेश प. कुवळा

सभेच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष मा. हिराभाई कुवळा यांनी उपस्थित सर्व विश्वस्तांचे हार्दिक स्वागत केले व त्यानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

०१. सभेपुढील पहीला विषय - मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजुरी देणे असा होता.

यासंदर्भात सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुवळा यांनी मागील दिनांक १८.१२.१५

रोजी संपन्न झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखविले. सदर इतिवृत्ताच्या पुर्ततेबाबत उपस्थितांमध्ये सविस्तर विचारविनिमय करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०१.

सहजीवन शिक्षण संस्थेच्या मागील दिनांक १८.१२.२०१५ रोजी संपन्न झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात येत आहे.

सूचक :- मा. विलास प. कुबल
अनुमोदक :- मा. नंदकुमार द. गुजराथी

ठराव सर्वानुमते मंजुर

०२. सभेपुढील दुसरा विषय - संस्थेचे सभासद श्री. कौस्तुभ हिराचंद कुबल यांचेकडून रु. ६६ लाख संस्थेच्या बँक-खात्यावर पाठवून देणार आहेत. बदलत्या काळाप्रमाणे ग्रंथालयासाठी ई-लायब्ररी सुविधा, अद्ययावत पुस्तके तसेच वाचनालयामध्ये आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देऊन स्वत:च्या अधीन शिक्षक व विद्यार्थ्यांच्या पुस्तकांवरचे खर्च व्हावा या अटीसह त्यांच्या कंपनीच्या



नांवाने ते देणगी देणार आहेत. त्याबाबत विचारविनिमय करणे असा होता.

या संदर्भात सहजीवन शिक्षण संस्थेतर्फे दि. २९ जाने २०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या आय. सी. एस. महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमाच्या निमित्ताने संस्थेचे सभासद मा. कौस्तुभभाई कुबल यांनी महाविद्यालयास भेट दिली असता महाविद्यालयाने अल्प काळात केलेल्या प्रगतीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. व भविष्यकालीन प्रगतीच्या दृष्टीने महाविद्यालयाचे ग्रंथालय व वाचनालयामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डीजिटल प्रणालीद्वारे ई-लायब्ररी सुविधा उपलब्ध व्हावी, आपल्या विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या ग्रंथालयांशी कनेक्टेड होता यावे, या दृष्टीने ग्रंथालय विकसित करण्याकरीता त्यांनी त्यांच्या कंपनीकडून संस्थेला रु. ६६ लाखाची देणगी दिली असल्याची माहिती सभेपुढे ठेवण्यात आली.

त्या अनुषंगाने चर्चा करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०२

→

ठराव क्र.०२

आपल्या संस्थेचे सभासद श्री. कौस्तुभ हिराचंद कुयला यांनी संस्थेस दिलेल्या रु. ६६ लाखाच्या देणगीबाबत संस्थेतर्फे त्यांचे आभार व्यक्त करण्यात येत असून त्यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेनुसार आय.सी.एस महाविद्यालयाचे ग्रंथालय तसेच आय.टी. विभागाचे ग्रंथालय यांच्या अत्याधुनिकीकरणाकरीताच त्यांच्या देणगीचा विनियोग करण्यात यावा. यासंदर्भात सदर ग्रंथालयांच्या तांत्रिकदृष्ट्या विकास आराखडा संबंधित विभागांच्या प्रमुखांकडून त्वरित बनवून घेण्यात यावा.

सुचक :- मा. डॉ. उपेंद्र ज. तलाठी
अनुमोदक :- मा. मंगेश प. कुयला

ठराव सर्वानुमते मंजूर

०३. सभेपुढील ३ रा विषय - मा. मदनभाई सुरा यांनी संस्थेला दिलेल्या पत्रानुसार वयोमानपरत्वे त्यांना संस्थेच्या वेळोवेळी होणाऱ्या सभांसाठी उपस्थित रहाणे अशक्य होत असल्यामुळे त्यांच्या जागी त्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. विजयभाई मेहता यांची नियुक्ती करणे असा होता.



यासंदर्भात आपल्या संस्थेचे विश्वस्त मा. मदनभाई सुरा यांना वयोमानपरत्वे संस्थेच्या सभांना उपस्थित रहाणे अशक्य होत असल्यामुळे त्यांच्या जागी त्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. विजयभाई मेहता यांची नियुक्ती करण्याबाबत पत्राद्वारे संस्थेला कळविले असल्याची माहिती सभेपुढे देण्यात आली.

याबाबत मा. मदनभाई सुरा यांनी सुचित केल्याप्रमाणे त्यांचे प्रतिनिधी म्हणून मा. डॉ. विजयभाई मेहता यांची नियुक्ती केल्यास मा. विजयभाई यांचा कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून असलेला शिक्षण क्षेत्रातील अनुभव हा आपल्या संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने निश्चितच मोलाचा व मार्गदर्शक ठरणारा आहे. अशी चर्चा करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र.०३

संस्थेचे विश्वस्त मा. मदनभाई सुरा यांना प्रकृती अस्वास्थामुळे संस्थेच्या वेळोवेळी आयोजित होणाऱ्या सभांना उपस्थित रहाता येत नाही त्यामुळे त्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. विजयभाई मेहता यांची नियुक्ती करण्याबाबत त्यांनी केलेली सुचना मान्य करण्यात येत असून मा. विजयभाई मेहता यांना मा. मदनभाई

यांचे प्रतिनिधी म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- मा. नंदकुमार द. गुजराथी
अनुमोदक :- मा. विलास प. कुयला

ठराव सर्वानुमते मंजूर

०४. सभेपुढील चौथा विषय - संस्थेचे सभासद श्री. कौस्तुभभाई कुयला यांचेकडून संस्थेची 'पीलर मेंबरशिप' मिळण्याकरीता आलेल्या प्रस्तावावर विचार विनिमय करणे असा होता.

यासंदर्भात संस्थेचे सभासद श्री. कौस्तुभभाई कुयला यांचेकडून संस्थेची "पीलर मेंबरशिप" मिळण्याकरीता संस्थेकडे प्रस्ताव दिला असल्याची माहिती सभेपुढे देण्यात आली. त्याचबरोबर सदर मेंबरशिप प्राप्त होणेकरीता संस्थेच्या घटनेनुसार आवश्यक असलेली फी रु. १०००००/- ही संस्थेकडे जमा झाले असल्याचे सभेपुढे सांगण्यात आले. त्यावर उपस्थितांनी चर्चा करतांना मा. कौस्तुभभाई यांनी मागील सुमारे १० वर्षात संस्थेच्या विकासामध्ये प्रामुख्याने तांत्रिक शिक्षणातील संस्थेच्या विकासात बहुमोल योगदान दिले असून आपल्या संस्थेत अत्याधुनिक तांत्रिक शिक्षणाचा विकास व्हावा यासाठी कायम



त्यांची तळमळ असल्याचे संस्थेचे उपाध्यक्ष मा. नंदकुमार गुजराथी यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. व आजच्या काळाची गरज म्हणून तांत्रिक शिक्षणाचा विकास आपल्या संस्थेत अधिक प्रभावीपणे होवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होण्यासाठी अशा व्यक्ती संस्थेच्या प्रमुख प्रवाहात असण्याची गरज उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०४

"संस्थेचे सभासद श्री. कौस्तुभभाई हिराचंद कुयला यांचेकडून आपल्या संस्थेची "पीलर मेंबरशिप" मिळण्याकरीता आलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत असून या पुढे श्री. कौस्तुभ हिराचंद कुयला यांच्या नावाची नोंद संस्थेच्या पीलर मेंबर या कॅटेगरीत करण्यात यावी.

सुचक :- मा. डॉ. उपेंद्र जी. तलाठी
अनुमोदक :- मा. नंदकुमार द. गुजराथी

ठराव सर्वानुमते मंजूर

०५ सभेपुढील पाचवा विषय - मागील संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत

ठरल्याप्रमाणे रौप्य महोत्सवी वर्षात ज्या दात्यांनी वर्गखोल्यांना नावे देण्यासाठी देणगी दिली आहे, अशा दात्यांनी सुचविलेल्या व्यक्तिस संस्थेचे सामान्य सभासद करून घेण्यास मान्यता देणे असा होता.

यासंदर्भात जी व्यक्ती संस्थेस रु. १ लाख किंवा त्यापेक्षा अधिक रकमेची देणगी देईल अशा ~~व्यक्ती~~ दात्यांनी सुचविलेल्या व्यक्तिस संस्थेचे सामान्य सभासदत्व देण्यात यावे, असे संस्थेच्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत निश्चित करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त वर्गखोल्यांना नावे देण्यासाठी देणगी दिलेल्या दात्यांनी सुचविलेल्या व्यक्तिस संस्थेचे सामान्य सभासद म्हणून मान्यता देण्याबाबत विचारविनिमय करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०५

ज्या दात्यांनी संस्थेच्या आय. सी. एस. महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त वर्गखोल्यांना नावे देण्यासाठी देणगी दिली आहे, अशा दात्यांनी सुचित केलेल्या व्यक्तिस संस्थेचे सामान्य सभासदत्व देण्यात यावे.

सुचक :- मा. विलास प. कुष्टा
अनुमोदक :- मा. डॉ. उपेंद्र जी. हलाठी

ठराव सर्वानुमते मंजूर

०६. सभेपुढील सहावा विषय- आय. सी. एस. महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी खर्चास (हायस्कुल व कॉलेज इमारतींच्या बांधकामासह) मान्यता देणे असा होता.

याबाबत आय. सी. एस. महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त अनेक मान्यवरांकडून जमा करण्यात आलेल्या निधीतून महाविद्यालय तसेच अभिमान चंदुलाल शेठ हायस्कुलकडील अतीमहत्वाची कामे पुर्ण करण्यात आली असल्याची माहिती झालेल्या खर्चासह सभेपुढे देण्यात आली त्यानुसार चर्चा करण्यात आल्यानंतर पुढील ठराव करणेत आला.

ठराव क्र. ०६

"संस्थेच्या आय. सी. एस. महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध शैक्षणिक उपक्रमांबरोबरच संस्थेचे अभिमान चंदुलाल शेठ हायस्कुल

व ज्युनिअर कॉलेज, आय. सी. एस. महाविद्यालय आणि आय. टी. विभाग याठिकाणी करण्यात आलेल्या अत्यावश्यक बांधकाम खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

सूचक :- मा. नंदकुमार द. गुजराथी
अनुमोदक :- मा. डॉ. उपेंद्र जी. तलाठी

ठराव सर्वानुमते मंजूर

सेक्रेटरी
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)

अध्यक्ष
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)



सहजीवन शिक्षण संस्था, खेड
विश्वस्त मंडळ सभा दि. २४.०४.२०१६
स्थळ :- एम. बी. ए. कॉलेज
वेळ :- स. ११.०० वाजता.

## इतिवृत्त

सहजीवन शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मंडळाची सभा रविवार दि. २४.०४.२०१६ रोजी स. ठीक ११.०० वाजता संस्थेच्या एम. बी. ए. कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे विश्वस्त उपस्थित होते.

०१. मा. हिराचंद प. बुटाला.
०२. मा. नंदकुमार द. गुजराथी
०३. मा. डॉ. विजयभाई मेहता.
०४. मा. मंगेश प. बुटाला.

सभेच्या सुरुवातीला अध्यक्ष मा. हिराचंद प. बुटाला यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

०१. सभेपुढील पहिला विषय - संस्थेच्या विनाअनुदानित विभागामधून जमा होणाऱ्या फी मधून संबंधित विभाग चालविण्याच्या व्यवस्थेविषयी चर्चा करणे.

यासंदर्भात सद्यस्थितीत संस्थेतर्फे चालविण्यात येत असलेल्या विनाअनुदानित अभ्यासक्रमांची माहिती सभेपुढे देण्यात आली

त्यानुसार उपस्थितांमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आल्यानंतर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०६.

"संस्थेच्या प्रत्येक विभागाच्या गव्हर्निंग कौन्सिलने वर्षाच्या सुरुवातीला आपापले बजेट तयार करावे व त्यास विश्वस्त मंडळाची मान्यता घेण्यात यावी. त्याचप्रमाणे त्या-त्या विभागात जमा होणारी फी किंवा कुठल्याही स्वरुपाचा निधी हा सर्वप्रथम संस्थेच्या खात्यात जमा होणे आवश्यक आहे. संबंधित विभागाच्या प्रमुखाला काही मर्यादेपर्यंत खर्चाचे अधिकार देण्यात यावेत. त्यापुढील खर्च हा अनुक्रमे गव्हर्निंग कौन्सिल व विश्वस्तांच्या मान्यतेनेच करण्यात यावा.

सुचक :- मा. डॉ. नंदकुमार द. गुजराथी
अनुमोदक :- मा. डॉ. विजयभाई मेहता.

ठराव सर्वानुमते मंजूर

०२. सभेपुढील दुसरा विषय- मुंबई विद्यापीठ व AICTE यांच्या रुपरेषेप्रमाणे संस्थेच्या एम.बी.ए. कॉलेजकरीता गव्हर्निंग कौन्सिल व LMC तयार करण्याबाबत विचारविनिमय करणे, असा होता.

याबाबतची सविस्तर माहिती उपस्थितांना देण्यात आल्यानंतर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०२

"संस्थेच्या घटनेतील तरतुदीप्रमाणे संस्थेच्या इतर युनिट्सप्रमाणे एम.बी.ए. कॉलेजसाठीही स्वतंत्र गव्हर्निंग कौन्सिल नियुक्त करणे आवश्यक होते. आता त्वरीत वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे अशक्य असल्यामुळे १५ पदाधिकाऱ्यांचा समावेश असलेली गव्हर्निंग कौन्सिल नियुक्त करण्याचे अधिकार संस्थेच्या विश्वस्त मंडळाला देण्यात येत आहेत.

सुचक :- मा. डॉ. विजयभाई मेहता
अनुमोदक :- मा. नंदकुमार द. गुजराथी

ठराव सर्वानुमते मंजूर

०३. सभेपुढील तिसरा विषय- M.B.A. कॉलेजच्या दैनंदिन कामकाजाकरिता पुर्णवेळ डायरेक्टरच्या नेमणुकीविषयी विचारविनिमय करणे असा होता.

यासंदर्भात उपस्थितांमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आल्यानंतर पुढीलप्रमाणे

ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०३

"एम. बी. ए. कॉलेजसाठी पुर्णवेळ डायरेक्टरची नियुक्ती होणे आवश्यक आहे. त्यासाठी उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेच्या निकषांबाबतची सविस्तर माहीती घेण्यात यावी. व त्यानुसार पुढील शैक्षणिक वर्षापासून एम. बी. ए. कॉलेजसाठी पुर्णवेळ डायरेक्टरची नियुक्ती करण्यात यावी.

सुचक:- मा. डॉ. विजयभाई मेहता.
अनुमोदक:- मा. मंगेशभाई कुयला

ठराव सर्वानुमते मंजूर

०४ सभेपुढील चौथा विषय:- संस्थेच्या नांवे बँक ऑफ महाराष्ट्र कडे असलेल्या कर्जाच्या सद्यस्थितीची माहीती घेवून कर्जखाते पुर्ण करणेविषयी व्यवस्था करणे असा होता.

यासंदर्भात संस्थेच्या नांवे बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा-खेड मध्ये असलेल्या कर्जाबाबतची माहीती घेण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०४

"एम. बी. ए. कॉलेजच्या नांवे ठेवण्यात आलेली २५ लाख रुपयांची कायम ठेव मोडून व्याजासह कर्जामध्ये भरण्यात यावी. सदर कायमठेव मोडण्याबाबत चेअरमन यांना पत्र देण्यात यावे. कर्मचाऱ्यांच्या ~~[illegible]~~ वेतनासाठीच्या रकमेची तरतुद सदर शाखेतील विद्यार्थ्यांच्या ~~[illegible]~~ जमा होणाऱ्या फी मधुन संस्थापातळीवर करण्यात यावी.

सुचक:- मा. नंदकुमार गुजराथी.
अनुमोदक:- मा. डॉ. विजयभाई मेहता.

ठराव सर्वानुमते मंजूर

०५ सभेपुढील पाचवा विषय- संस्थेच्या विनाअनुदानित विभागातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या तसेच वेतनवाढ याविषयी विचारविनिमय करणे

सदर विषयासंदर्भात उपस्थितांमध्ये सविस्तर विचारविनिमय करतांना संस्थेच्या विनाअनुदानित अभ्यासक्रमांची माहिती घेण्यात आल्यावर चर्चा करण्यात येवून पुढीलप्रमाणे ठराव करणेत आला.

→

## ठराव क्र. ०५

संस्थेच्या एम.बी.ए. कॉलेजकडील Staff Appointment तसेच Increment यासंदर्भातील सर्व अधिकार हे संस्थेच्या विश्वस्त मंडळाला असावेत. चेअरमन, गव्हर्निंग कौन्सिल यांनी कोणतीही नियुक्ती केल्यास त्यास किमान विश्वस्त मंडळाची मान्यता घेण्यात यावी. त्याचप्रमाणे Staff Appointment ही विद्यापीठाच्या नियमानुसार करण्यात यावी व या निवड समितीमध्ये विश्वस्त मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश असावा.

सूचक :- मा. नंदकुमार द. गुजराथी
अनुमोदक :- मा. डॉ. विजयभाई मेहता.

ठराव सर्वानुमते मंजूर.

०६ सभेपुढील सहावा विषय- एम.बी.ए. कॉलेजचे समन्वयक प्रा. सतिश कदम यांच्याकडून आलेल्या पत्राविषयी विचार-विनिमय करणे असा होता.

यासंदर्भात एम.बी.ए. कॉलेजचे समन्वयक प्रा. सतिश कदम यांनी संस्थेकडे दिलेल्या पत्राची माहिती सभेला देण्यात आली व त्या अनुषंगाने चर्चा करण्यात आल्यावर पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.



## ठराव क्र. ०६

"एम.बी.ए. कॉलेजचे समन्वयक प्रा. सतिश कदम यांना संस्थेकडून देण्यात आलेल्या पत्रानुसार खालील पदाधिकाऱ्यांची चौकशी समिती नियुक्त करण्यात येत आहे.

०१. मा. नंदकुमार द. गुजराथी - उपाध्यक्ष, सहजीवन शिक्षण संस्था
०२. मा. संजय व. मोदी - संचालक, MBA कॉलेज
०३. डॉ. जी.बी. सारंग - प्राचार्य, आय.सी.एस. कॉलेज

या समितीने आपला अहवाल विश्वस्त मंडळाला सादर करावा.

सूचक :- मा. हिराचंद प. कुवळा.
अनुमोदक :- मा. डॉ. विजयभाई मेहता

ठराव सर्वानुमते मंजूर.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यावर सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुवळा यांनी उपस्थितांचे आभार मानले. व स्नेहभोजन होवून ही सभा संपन्न झाली.

(स्वाक्षरी)
सेक्रेटरी
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी).

(स्वाक्षरी)
अध्यक्ष
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी).

सहजीवन शिक्षण संस्था, खेड
विश्वस्त मंडळ सभा दि. ३१.०८.२०१६
स्थळ : श्री. नितिनभाई तलाठी यांचे
निवासस्थान, गितांजली अपा. पुणे
वेळ :- स. ११.३० वाजता.

## इतिवृत्त

सहजीवन शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मंडळाची सभा रविवार दि. ३१.०८.२०१६ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता श्री. नितिनभाई तलाठी यांचे निवासस्थानी, गितांजली अपा. शिवाजीनगर पुणे येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे विश्वस्त व निमंत्रित उपस्थित होते.

०१. मा. हिरान्चंद प. कुटाला
०२. मा. नंदकुमार द. गुजराथी.
०३. मा. डॉ. विजयभाई मेहता.
०४. मा. विलास प. कुटाला.
०५. मा. मंगेश प. कुटाला.

विशेष निमंत्रित

०१. मा. नितिन सु. तलाठी
०२. मा. विवेक म. सुरा.
०३. मा. ॲड. आनंदराव भोसले.

सभेच्या सुरुवातीला अध्यक्ष मा. हिराभाई कुटाला यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

०१ - सभेपुढील पहिला विषय- मागील सभेचे

इतिवृत्त वाचून त्यास मंजूरी देणे असा होता.

यासंदर्भात सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुयला यांनी सहजिवन शिक्षण संस्थेच्या मागील दि. २४.०४.२०१६ रोजी संपन्न झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखविले.

सदर इतिवृत्तावर चर्चा करण्यात येवून पुढील ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०१

"सहजिवन शिक्षण संस्थेच्या मागील दि. २४.०४.२०१६ रोजी संपन्न झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक:- श्री. नंदकुमार द. गुजराथी
अनुमोदक:- श्री. विलास प. कुयला

ठराव सर्वानुमते मंजूर

०२. सभेपुढील दुसरा विषय - VSMSIBM या कॉलेजबाबत अध्यक्षांचे निवेदन असा होता.

यासंदर्भात संस्थाध्यक्ष मा. हिराभाई कुयला यांनी मागील सुमारे ०६ वर्षापासून संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने सुरु केलेले MBA कॉलेज, त्यासाठी VIM सुवा या संस्थेकडे केलेला MOU त्याच्याप्रमाणे सहजिवन व VIM या दोन्ही संस्थांचे सदस्य मिळून एकत्रितपणे तयार केलेल्या गव्हर्निंग कौन्सिलने केलेला अपेक्षाभंग याचा सविस्तर आढावा घेतला. तसेच सहयाद्रीतील मागील ०६ वर्षात त्यांनी दिलेल्या Balance sheet सहजिवन शिक्षण संस्थेच्या Balance sheet मध्ये वर्ग केल्यानंतर दिसून येणाऱ्या त्रुटी, कर्मचाऱ्यांकडून आलेले तक्रारी अर्ज, AICTE व मुंबई विद्यापीठाच्या निकषानुसार व्यवस्थापन कमिट्या दिसून आल्या नाहीत. तसेच पुढील NAAC Accreditation करिता दिसून येणाऱ्या त्रुटी या सर्व बाबी संस्थेच्या हितास बाधा आणणाऱ्या असल्यामुळे तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याचे निवेदन केले.

०३- सभेपुढील तिसरा विषय - AICTE च्या नियमानुसार विद्यमान गव्हर्निंग बॉडी व LMC कमीटी स्थापन करण्यात आलेल्या नसल्यामुळे तशा कमिट्या स्थापन करण्याबाबत विचारविनिमय करणे असा होता.

यासंदर्भात दि. २४.०४.२०१६ रोजी MBA कॉलेज खेड येथे झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेतील ठराव क्र. ०२ नुसार संस्थेच्या एम.बी.ए. कॉलेजसाठी १५ सदस्यांचा समावेश असलेली गव्हर्निंग कौन्सिल स्थापन करणे आवश्यक असल्याचे

सभेच्या निदर्शनास आणून देण्यात आल्यावर त्यासंदर्भात सविस्तर विचार विनिमय करण्यात आल्यावर खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र. ०२

"सद्जविन शिक्षण संस्थेच्या "विश्वकर्मा सद्जविन मदनभाई सुरा इन्स्टिट्युट ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट (VSMSIBM) च्या गव्हर्निंग कौन्सिलसाठी उच्च विद्याविभुषीत अशा खालील सदस्यांची गव्हर्निंग कौन्सिल स्थापन करण्यात येत आहे.

०१. श्री. नंदकुमार द. गुजराथी
०२. श्री. मंगेश प. कुवला
०३. डॉ. विजयभाई मेहता.
०४. डॉ. संजिव ना. धारिया.
०५. श्री. नितिन सु. तलाठी
०६. श्री. संजय व. भोंदू.
०७. श्री. कौस्तुभ हि. कुवला
०८. ॲड. आनंदराव भोसले.
०९. श्री. विवेक म. सुरा
१०. श्री. राजेश सु. कुवला.
११. श्री. सिध्देश नं. गुजराथी.
१२. डॉ. शिवाजीराव पाटील.
१३. श्री. मितेश मं. कुवला.
१४. श्री. निरज नि. तलाठी
१५. श्री. शेखर सु. तलाठी

सदर कमिटीची लवकरच खेड येथे



स्वतंत्रपणे सभा लावून AICTE व मुंबई विद्यापीठाच्या नियमानुसार त्यापैकी पांच पदाधिकाऱ्यांची MBA च्या कमिटीसाठी निवड करण्यात यावी.

सुचक:- मा. डॉ. विजयभाई मेहता.
अनुमोदक:- मा. मंगेश प. कुवला.

ठराव सर्वानुमते मंजूर

०४. सभेपुढील चौथा विषय - सद्जविन शिक्षण संस्थेच्या घटनेप्रमाणे MBA कॉलेजच्या सध्या अस्तित्वात असलेल्या कमेटीवरील सदस्य पदाधिकाऱ्यांची नियुक्ती रद्द करणेबाबत... असा होता.

या विषयावर चर्चा करीत असताना दि. २३.०७.२०१६ रोजी चेअरमन डॉ. संजिव धारीया यांना संस्थेकडून दिलेल्या पत्रानुसार अभ्यासक्रमातील त्रुटींसंदर्भात त्यांनी दिनांक २५.०७.२०१६ रोजी पाठविलेले उत्तर हे समाधानकारक वाटत नाही. व अभ्यासक्रमातील त्रुटी काढण्यात त्यांच्याकडून सहकार्याची भुमिका आढळून आली नाही. अशा स्वरुपाच्या संस्थेच्या हितास बाधा येईल अशा त्यांच्या कृतीमुळे ही सभा खालीलप्रमाणे ठराव करीत आहे

→

ठराव क्र.०३

"डॉ. संजीव नानालाल धारिया, श्री शामकांत दत्तात्रय धारीया व श्री. संजय वसंत मोदी यांची सहजिवन शिक्षण संस्थेकडून MBA कॉलेजसाठि सदस्य म्हणुन केलेली नियुक्ती रद्द करण्यात येत आहे.

सुचक:- मा.डॉ. विजयभाई मेहता
अनुमोदक:- मा. नंदकुमार द. गुजराथी

ठराव सर्वानुमते मंजूर

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सेक्रेटरी मा. मंगेशभाई कुयत्या यांनी उपस्थितांचे आभार मानले व चहापान होवुन ही सभा संपन्न झाली.

सेक्रेटरी
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)

अध्यक्ष
सहजीवन शिक्षण संस्था
खेड (रत्नागिरी)